# शेजारती

रात्री १० वाजता

## (१) आरती

ओवाळूं आरती माझ्या सद्‌गुरूनाथा, माझ्या साईनाथा ॥
पाचाही तत्वांचा दीप लाविला आतां ॥

निर्गुणाची स्थिती कैसी आकारा आली ॥
सर्वां घटीं भरूनि उरली साई माउली ॥ ओवाळूं० ॥

रज तम सत्व तिघे माया प्रसवली ॥
मायेचिये पोटीं कैसी माया उद्भवली ॥ ओवाळूं० ॥

सप्तसागरीं कैसा खेळ मांडिला ॥
खेळूनिया खेळ अवघा विस्तार केला ॥ ओवाळूं० ॥

ब्रह्मांडीची रचना कैसी दाखविली डोळां ॥
तुका म्हणे माझा स्वामी कृपाळू भोळा ॥ ओवाळूं० ॥